म्हाडा
MHADA

# कार्यकारी अभियंता / ई-१ विभाग

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (म्हाडाचा घटक)
तळ मजला, इमारत क्र. ३४,अभ्युदय नगर,काळाचौकी, मुंबई - ३३
ई मेल-rreee1mhada@gmail.com

जा.क्र. का. अभि./ई-१ विभा./2648/२०२५
दिनांक 22/09/2025

प्रति,

**ना-हरकत प्रमाणपत्रधारक;**

**१. श्री. फ्रान्सिस पीटर ॲंटोनी फर्नांडिस (सदनिका क्र. ६, दुसरा मजला)**
**२. श्री. जॉन ॲंटोनी फ्रान्सिस्को लोपेज (सदनिका क्र. ९/१०, दुसरा मजला)**
इमारत क्र. १०२-१०८; डिलीमा स्ट्रिट, खोदादाद चाळ,
माझगाव मुंबई-४०००३३.

**वास्तुशास्त्रज्ञ,**
**मे. गजारिया असोसिएट्स**
५/२८, ताडदेव ए/सी मार्केट
मुंबई-४०००३४

**विषय** :- उपकरप्राप्त इमारत क्र. १०२-१०८, डिलीमा स्ट्रिट, खोदादाद चाळ माझगाव मुंबई-४०००३३ च्या (परताव्यासह) ना-हरकत प्रमाणपत्राद्वारे पहिल्या टप्प्यात दुरुस्तीबाबत
- अंदाजपत्रक व नकाशे सादर करणेबाबत

**संदर्भ** :-
१. वास्तुशास्त्रज्ञ, मे. गजारिया असोसिएट्स यांचे दिनांक ३०.०४.२०२५ रोजीचे पत्र व सोबत प्रस्ताव
२. या कार्यालयाची टिप्पणी क्र. २२६२७६३, दिनांक ०४.०८.२०२५
३. उपमुख्य अभियंता (परि-०३) / मुं.इ.दु.व पु. मंडळ यांचे. इ ऑफिस पत्र क्र -६५३३९८२, दिनांक २१.०८.२०२५ अन्वये जारी करण्यात आलेले (परताव्यासह) ना-हरकत प्रमाणपत्र

महोदय / महोदया;

विषयांकित प्रकरणी संदर्भाधिन पत्र क्र. ३ अन्वये उपमुख्य अभियंता (परि-०३) / मुं. इ. दु. व पु. मंडळ यांचेमार्फत (परताव्यांसह) ना-हरकत प्रमाणपत्र जारी करण्यात आले आहे. सदर प्रमाणपत्रातील अटी व शर्तींची पुर्तता येत्या आठ दिवसांत करण्यात यावी, अन्यथा सदर ना-हरकत प्रमाणपत्र आपोआप रद्दबातल होईल, याबाबत आपणांस या कार्यालयामार्फत सदर ना-हरकत प्रमाणपत्राची प्रत रवाना करतेवेळी कळविण्यात आले आहे.

सदर अटी व शर्तींची पुर्तता अद्यापही आपण न केल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे. सबब प्रामुख्याने खालील अटींची पुर्तता आपण हे पत्र प्राप्त झाल्यापासुन १५ दिवसांत करावी, अन्यथा सदर ना-हरकत प्रमाणपत्र रद्दबातल करण्यात येईल, याची आपण नोंद घ्यावी.

अट क्र. १८) सदर इमारत दुरुस्ती केल्यानंतर इमारत सुस्थितीत येईल या बाबत नोंदणीकृत Structural Engineer चे त्यांच्या Letter head वरिल मुळ प्रमाणपत्र व सदर Structural Engineer च्या नोंदणी प्रमाणपत्राची स्वयंसाक्षांकित प्रत अंदाजपत्रकासोबत सादर करणे आपणास बंधनकारक आहे. (प्रमाणपत्राचा मसुदा संलग्न)

याव्यतिरीक्त खालील अटी व शर्तींची आपण कृपया नोंद घ्यावी.

अट क्र. १) आपण सदर दुरुस्तीकामासाठी नेमणुक केलेल्या ठेकेदाराचे दुय्यक निबंधक यांच्याकडुन नोंदणीकृत केलेले

मुखत्यारपत्राची एक छायांकित प्रत या कार्यालयास सादर करावी.

अट क्र. १०) या कार्यालयामार्फत द्वितीय संयुक्त पाहणी करण्यात आल्याशिवाय कामास सुरुवात करण्यात येऊ नये.

अट क्र. २२) विषयांकीत इमारतीच्या दुरुस्तीसाठी झालेला खर्च व (परताव्यासह) ना-हरकत प्रमाणपत्राद्वारे प्रस्तावित दुरुस्ती कामास १००% भाडेकरु / रहिवासी यांची संमती असल्याचे प्रमाणपत्र आपण (ना-हरकत प्रमाणपत्र धारक यांनी) या कार्यालयास सादर करावे. (प्रमाणपत्राचा मसुदा संलग्न)

वरील अटी व शर्ती व्यतिरीक्त सदर कामाच्या देयकाच्या अदायगीसाठी सादर कण्यात येणाऱ्या मोजमाप वहीवर (Measurement Book) ना-हरकत प्रमाणपत्र धारकांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे, याची आपण नोंद घ्यावी.

आपली विश्वासु,

22/09/25

**कार्यकारी अभियंता**
ई-१ विभाग / मुं.इ.दु.व पु. मंडळ

O/C ... D.B.

**सोबत :-**

१) अट क्र. १८ प्रमाणे प्रमाणपत्राचा मसुदा
२) अट क्र. २२ प्रमाणे प्रमाणपत्राचा मसुदा

**प्रत;**

- उपमुख्य अभियंता (परि-०३) / मुं.इ.दु.व पु. मंडळ यांस माहितीस्तव सादर (ई-ऑफिस द्वारे रवाना)
- सहाय्यक आयुक्त / ई-१ विभाग / बृहन्मुंबई महानगर पालिका यांस माहितीस्तव अग्रेषीत
- कार्यकारी अभियंता / माहिती व संचार तंत्रज्ञान कक्ष, यांस माहितीस्तव व मा. मुख्य अधिकारी / मु.इ.दु.व पु. मंडळ यांच्या पत्र क्र. ६०८६, दिनांक ११.०७.२०२३ अन्वये सदर ना-हरकत प्रमाणपत्राची प्रत म्हाडाच्या संकेतस्थळावरील दुरुस्ती मंडळाच्या Page वर Upload करण्यासाठी. (सोबत- ना-हरकत प्रमाणपत्राची छायांकित प्रत) (ई-ऑफिस द्वारे रवाना)
- सहाय्यक अभियंता (पाणी खाते) / ई-१ विभाग / बृहन्मुंबई महानगर पालिका यांस माहितीस्तव
- सहाय्यक लेखाधिकारी (परि-०३) / मुं.इ.दु.व पु. मंडळ यांस माहितीस्तव. (ई-ऑफिस द्वारे रवाना)